


# रोपवाटिका व्यवस्थापनाचे महत्त्व



**नीलिमा गोबाडे**
(पीएच.डी. स्कॉलर),
वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी

रोपवाटिकेतून जातिवंत रोपांची, कलमांची आणि बियाण्यांची उत्पत्ती, रोपांचे संगोपन व संवर्धन निरनिराळ्या अभिवृद्धीतून एकत्रितपणे केलेले असते.

रोपवाटिकांचे विविध प्रकार असे आहेत.

१) **कोरडवाहू रोपवाटिका** : पावसाच्या पाण्यावर अवलंबून असलेली रोपवाटिका, यामध्ये रोपांचे उत्पादन व संगोपन करण्यात येते.

२) **ओलिताखालची रोपवाटिका** : या ठिकाणी बारमाही पाणी उपलब्ध असते, त्यावर रोपांचे व कलमांचे उत्पादन व संगोपन केले जाते.

### रोपवाटिकेचे महत्त्व असे सांगता येईल

१) सावकाश वाढ होणाऱ्या झाडांचे रोपवाटिकेत चांगल्याप्रकारे संगोपन करून ती लागवडीसाठी वापरता येतात. २) कमी जागेत मोठ्या प्रमाणावर रोपे तयार करता येतात. ३) रोपांचे संगोपन चांगल्या प्रकारे होते. ४) रोपावरील किडी व रोगाचे नियंत्रण करणे सोयीचे होते. ५) रोपावर शास्त्रीय अभिवृद्धी करता येते. उदा. डोळे भरणे, भेट कलम, गुटी कलम करणे इत्यादी. ६) उत्पादनक्षम व जातिवंत फळझाडांची कलमे व रोपे तयार करता येतात.

### रोपवाटिकेत उद्‌भवणारे महत्त्वाचे रोग व उपाय

१) **डॅम्पिंग ऑफ (रोप कोलमडणे)** : रोपवाटिकेत पाणी साचून राहिल्यास बुरशीमुळे हा रोग होतो. त्यासाठी बुरशीनाशकाची ड्रेंचिंग करावी. उदा. कॉपर ऑक्सिक्लोराईड वापरावे.

२) **मुळ कुजव्या** : कलमाच्या किंवा रोपाच्या मुळ्या कुजतात. हा रोग बुरशीपासून होतो. कॉपर ऑक्सिक्लोराईड ३०० ग्रॅमचे १०० लि. पाण्यात द्रावण तयार करून मुळांवाटे द्यावे.

### रोपवाटिकेतील महत्त्वाच्या किडी व उपाय

१) **माईट्स** : ही अतिसूक्ष्म कीड आहे. पानातील रस शोषण करते. पाण्यात ८० टक्के मिसळणारे २५० ग्रॅम गंधक १०० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.



२) **पाने खाणारी अळी** : पाने पोखरून आतील भाग खाते, पानांवर नागमोडी चट्टे दिसतात. पाने वाळतात. याकरिता मेलॅथिऑन ५० टक्के प्रवाही फवारावे.

३) **मावा** : कोवळ्या पानांतील आणि फळांतील रस शोषतात. काळी बुरशी वाढते. याकरिता मोनोक्रोटोफॉस ३५ टक्के प्रवाही फवारावे. ■